**दिनांक ३/८/ २०२३**

प्रिय सभासद् बंधू भगिनींनो, आज आपल्या सोसायटी च्या पुनर्निर्माण प्रकल्पा चा एक महत्वाचा टप्पा पार करण्यात आला.

आज आपण निवडलेल्या न्याती- शुभम- निर्माण (LLP partners) ह्या विकासक समुहा ला आपल्या सोसायटी चे पुनर्निर्माण करण्या चे इरादा पत्र (Letter of Intent) आपल्या सोसायटी चे अध्यक्ष श्री विजय सावंत यांच्या हस्ते, एका छोटेखानी समारोहात, देण्यात आले.

ह्या साठी बिल्डर्स कडून श्री प्रणव न्याति, श्री अमित नाटेकर , श्री संदीप माहेश्वरी, श्री वढेरा, आपले प्रकल्प सल्लागार श्री हर्षल कवडिकर आणि पंच समिती सदस्य उपस्थित होते.

ह्या प्रसंगी तिन्ही बिल्डर पार्टनर्स ने "पत्रकार नगर चे पुनर्निर्माण हा त्यांच्या साठी एक मोठा महत्वाकांशी प्रकल्प असल्याचे आणि सोसायटी ने दिलेल्या संधी चे सोने करण्याचे ते सर्वस्वी प्रयत्न करतील अशी ग्वाही दिली. प्रकल्प शिघ्रतेने पुढे नेण्याचा निर्धार ही त्यांनी व्यक्त केला.
सचिव श्री विनायक पटवर्धन यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून समारोह संपल्याचे जाहिर केले.

**विनायक पटवर्धन सचिव**